**केंद्र शासनाचे "नैसर्गिक वायू व पेट्रोलियम पदार्थ वितरण आदेश, २०२६" राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यांना लागू करण्याबाबत..**

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक :-गॅविसु-२०२६/प्र.क्र.११६/नवि-२०**

४ था मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २२ एप्रिल, २०२६

**वाचा :-** केंद्र शासनाचे राजपत्र, सी.जी.-डी.एल.-अ.-२४०३२०२६-२७१२४८,
दिनांक २४ मार्च, २०२६.

**प्रस्तावना :**

सद्यस्थितीमध्ये सुरू असलेल्या जागतिक भू-राजकीय घडामोडींमुळे भारतामध्ये ऊर्जा / इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला असून एलपीजी उपलब्धतेवर मर्यादा आल्या आहेत. सदर परिस्थितीमध्ये घरगुती ग्राहकांना पीएनजी (Piped Natural Gas) पुरविल्यास एलपीजी वरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. सबब, केंद्र शासनामार्फत लोकहितास्तव पीएनजी विस्तारात गती मिळण्याकरिता एकसमान कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी दि.२४ मार्च, २०२६ रोजीच्या अधिसूचनेन्वये निर्गमित करण्यात आलेले "नैसर्गिक वायू व पेट्रोलियम पदार्थ वितरण आदेश, २०२६" राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

पीएनजी विस्तारात गती मिळण्याकरिता एकसमान कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी लोकहितास्तव केंद्र शासनामार्फत दि.२४ मार्च, २०२६ रोजीच्या अधिसूचनेन्वये निर्गमित करण्यात आलेले "नैसर्गिक वायू व पेट्रोलियम पदार्थ वितरण आदेश, २०२६" राज्यातील सर्व महानगरपालिका/ नगरपरिषदा / नगरपंचायती यांना हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू करण्यात येत आहेत.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२२१७५५३२२५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

ANILKUMAR R UGLE

Digitally signed by ANILKUMAR R UGLE
DN: CN = ANILKUMAR R UGLE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = Urban Development Department
Date: 2026.04.22 17:57:00 +05'30'

**(अनिलकुमार रा. उगले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८) सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
९) सर्व विभागीय आयुक्त.
१०) सर्व जिल्हाधिकारी.
११) सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१२) आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई.
१३) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती.
१४) निवडनस्ती (नवि-२०).